**महाराष्ट्र शासन**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१
Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

क्रमांक - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२०/ पुणे विभाग/२४/8467 दि. २६/१२/२०२४.

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२. कुलसचिव, सर्व अकृषी खाजगी विद्यापीठे, पुणे विभाग
२. प्राचार्य / प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित/कायम विनाअनुदानित
स्वायत्त महाविद्यालये,
**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हे.**

विषय - **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने मुक्त व्यासपीठ उपक्रम राबविणेबाबत..**

संदर्भ - १. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/विशि-३ शिकाना दि. ३०.८.२०२४.
२ मा. शिक्षण संचालक, उ.शि. यांचे पत्र क्र. युएनआय/(१३६/२२)/विशि-१/भाग-३/५३४२ दि. २४.१२.२०२४

कृपया सोबत जोडलेले परिपत्रक अवलोकनी घ्यावे.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन निर्णयान्वये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने गठीत उपसमितीच्या अहवालातील शिफारसीच्या अंमलबजावणीसंदर्भात आढावा घेऊन येणा-या अडचणी निवारणासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी व मार्गदर्शन करणेसाठी संदर्भिय शासन निर्णयान्वये सुकाणू समिती पुर्नगठीत करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची सुत्रबध्द पध्दतीने उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत अंमलबजावणी होत आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सर्व अकृषी विद्यापीठातील विभाग व स्वायत्त महाविद्यालयात शासन निर्णयानुसार नवीन अभ्यासक्रम पध्दती व श्रेयांक पध्दती लागू करण्यात आली आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून उर्वरित संलग्नित महाविद्यालयात त्यांची अंमलबजावणी सुरु झाली आहे.

या संदर्भात सर्व विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांचे प्रबोधन आणि मार्गदर्शन वेळोवेळी करण्यात येत आहे. तरीदेखील काही विषयाबाबत तज्ञांमार्फत आणखी मार्गदर्शन व प्रबोधन व्हावे अशी मागणी होत आहे. या अनुषंगाने शासनाने **दर शनिवारी सकाळी ११.०० ते १२.३० दरम्यान ऑनलाईन पध्दतीने प्रबोधनपर मुक्त व्यासपीठ सुरु करण्याचे ठरविले आहे.**

दर **शनिवारी सकाळी ११.०० ते १२.३०** या कालावधीत राज्यस्तरीय सुकाणू समितीतील खालील तज्ञ सदस्य ऑनलाईन माध्यमातून उलपब्ध असतील.

| अ.क्र. | तज्ञ सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. अनिल राव, माजी प्राचार्य, एम.जे. कॉलेज, जळगांव | अध्यक्ष |
| २ | डॉ. डी.टी. शिर्के, कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर | सदस्य |
| ३ | डॉ. आर.डी. कुलकर्णी, कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई | सदस्य |
| ४ | डॉ. व्ही.एल. माहेश्वरी, कुलगुरु, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव | सदस्य |
| ५ | डॉ. मुरलीधर चांदेकर, माजी कुलगुरु, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | सदस्य |
| ६ | डॉ. जोगेंद्रसिंग बिसेन, प्र.कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | सदस्य |
| ७ | डॉ. माधव वेलिंग, अध्यक्ष, एस.व्ही.के.एम. यांचे सल्लागार व प्र-कुलगुरु, एन.एम.आय.एम.एस. मुंबई | सदस्य |
| ८ | डॉ. विनोद मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई | सदस्य |
| ९ | डॉ. शैलेन्द्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण, पुणे | सदस्य |

या सत्रादरम्यान प्राचार्य, संस्थाचालक, अध्यापक, विद्यार्थी, पालक व इतर संबंधित यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी संदर्भातील विचारलेल्या प्रश्नांची उकल व निराकरण त्वरीत वरील तज्ञांमार्फत करण्यात येईल.

तरी सर्व संबंधितांनी खालील दिलेल्या **लिंकच्या** माध्यमातून या उपक्रमामध्ये **प्रत्येक शनिवारी** सहभागी व्हावे. या उपक्रमाची सुरुवात **जानेवारी २०२५ पासून होत असून पहिले सत्र शनिवार दिनांक ०४ जानेवारी, २०२५ रोजी आयोजित करण्यात येईल.**

Online Weekly Series – NEP 2020
Host : Director, DHE, Pune
]Topic : Open Interaction with NEP Steering Committee
Day : Every Saturday Time : 11:00 AM
Zoom Link : https://zoom.us/i/99562255769

(डॉ. अशोक उबाळे)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे.

सोबत - वरीलप्रमाणे.

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

महाराष्ट्र शासन

उच्च शिक्षण संचालनालय,.महाराष्ट्र राज्य,

४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर पुणे-४११ ०१६

Web : www.dhepune.gov.in E-mail:vishi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९

क्रमांक-युएनआय/(१३६/२२)/विशि-१/भाग-३ | ५३४२ दि. डिसेंबर, २०२४

24 DEC 2024

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

विषय राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने मुक्त व्यासपीठ उपक्रम राबविणेबाबत.

संदर्भ शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/विशि-३ शिकाना दि.३० ऑगस्ट, २०२४

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन निर्णयान्वये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने गठीत उपसमितीच्या अहवालातील शिफारसीच्या अंमलबजावणीसंदर्भात आढावा घेऊन येणाऱ्या अडचणी निवारणासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी व मार्गदर्शन करणेसाठी संदर्भिय शासन निर्णयान्वये सुकाणू समिती पुनर्गठीत करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची सुत्रबद्ध पद्धतीने उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत अंमलबजावणी होत आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सर्व अकृषी विद्यापीठातील विभाग व स्वायत्त महाविद्यालयात शासन निर्णयानुसार नवीन अभ्यासक्रम पद्धती व श्रेयांक पद्धती लागू करण्यात आली आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून उर्वरित संलग्नित महाविद्यालयात त्यांची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

यासंदर्भात सर्व विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांचे प्रबोधन आणि मार्गदर्शन वेळोवेळी करण्यात येत आहे. तरीदेखील काही विषयांबाबत तज्ञांमार्फत आणखी मार्गदर्शन व प्रबोधन व्हावे अशी मागणी होत आहे. या अनुषंगाने शासनाने दर शनिवारी सकाळी ११.०० ते १२.३० दरम्यान ऑनलाईन पद्धतीने प्रबोधनपर मुक्त व्यासपीठ सुरू करण्याचे ठरविले आहे.

दर शनिवारी सकाळी ११.०० ते १२.३० या कालावधीत राज्यस्तरीय सुकाणू समितीतील खालील तज्ञ सदस्य ऑनलाईन माध्यमातून उपलब्ध असतील.

| अ.क्र. | तज्ञ सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.अनिल राव<br>माजी प्राचार्य, एम.जे.कॉलेज, जळगाव | अध्यक्ष |
| २ | डॉ.डी.टी.शिर्के,<br>कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य |
| ३ | डॉ.आर.डी.कुलकर्णी,<br>कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई | सदस्य |
| ४ | डॉ.व्ही.एल.माहेश्वरी,<br>कुलगुरू, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | सदस्य |
| ५ | डॉ.मुरलीधर चांदेकर<br>माजी कुलगुरू, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | सदस्य |
| ६ | डॉ.जोगेंद्रसिंग बिसेन,<br>प्र-कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | सदस्य |
| ७ | डॉ.माधव वेलिंग,<br>अध्यक्ष, एस.व्ही.के.एम. यांचे सल्लागार व प्र-कुलगुरु, एन.एम.आय.एम.एस., मुंबई | सदस्य |
| ८ | डॉ.विनोद मोहितकर,<br>संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई | सदस्य |
| ९ | डॉ.शैलेन्द्र देवळाणकर<br>संचालक, उच्च शिक्षण, पुणे | सदस्य |

या सत्रादरम्यान प्राचार्य, संस्थाचालक, अध्यापक, विद्यार्थी, पालक व इतर संबंधित यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी संदर्भातील विचारलेल्या प्रश्नांची उकल व निराकरण त्वरीत वरील तज्ञांमार्फत करण्यात येईल.

तरी सर्व संबंधितांनी खाली दिलेल्या लिंकच्या माध्यमातून या उपक्रमामध्ये प्रत्येक शनिवारी सहभागी व्हावे. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण व कुलसचिव सर्व अकृषी विद्यापीठे यांनी सदरील उपक्रमाबाबत आपल्या स्तरावरून आपल्या अधिनस्त महाविद्यालयांना कळवावे.

**Online Weekly Series - NEP 2020**
**Host : Director, DHE, Pune**
**Topic : Open Interaction with NEP Steering Committee**
**Day : Every Saturday Time : 11:00 AM**
**Zoom Link : https://zoom.us/j/99562255769**

या उपक्रमाची सुरवात जानेवारी २०२५ पासून होत असून पहिले सत्र शनिवार दि.०४ जानेवारी, २०२५ रोजी आयोजित करण्यात येईल.

(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६.

**प्रत- माहितीस्तव सादर**
मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२